**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in

फोन नं . - 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. महाडीबीटी-2025-26/(E - 6401951/2025)/ दिनांक : 01.12.2025

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ कला, वाणिज्य,
   विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - दि. 28 नोव्हेंबर, 2025 ते 12 डिसेंबर, 2025 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविणेबाबत. .**

संदर्भ : - शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य-2025-26/ डीबीटी/ दि. 25.11.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर कळविण्यात येते की, मा. संचालनालयाच्या दि. 20.11.2025 रोजीच्या बैठकीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज फार कमी प्रमाणात प्राप्त होत असलेबाबत चर्चा झाली. तथापि अर्जांची संख्या वाढविणेसाठी विशेष उपाय योजना करणेबाबत ठरविण्यात आले.

राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता महाडीबीटी पोर्टल वरुन पात्र विद्यार्थ्यांकडून दि. 30.06.2025 पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या खाली नमूद केल्याप्रमाणे 14 शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| 6 | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| 7 | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| 8 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| | |

| | |
|---|---|
| 9 | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 10 | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 11 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 12 | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-2) |
| 13 | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 14 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या संकेत स्थळावर https://mahadbt.maharashtra.gov.in यावर मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि विद्यापीठ, महाविद्यालय, संस्थेसाठी सूचना याबाबत सविस्तरपणे मा. संचालनालयाचे दि. 07.07.2025 व दि. 25.09.2025 च्या तसेच या कार्यालयाचे दि. 09.07.2025 रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे. तथापि अद्यापही अर्जांची संख्या खूप कमी असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणेकरीता दि. 28.11.2025 ते दि. 12.12.2025 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविण्यात यावा. याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विद्यार्थ्यांनी करावयाची पूर्वतयारी –**

1. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरताना साधारणत: उत्पन्न प्रमाणपत्र , महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.
2. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.
3. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.
4. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिति पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.
5. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

**महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी करावयाची पूर्वतयारी –**

1. महाविद्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयातर्फे संगणक, प्रिंटर, इंटरनेट इत्यादी सेवा नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावे.
2. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरताना उत्पन्न प्रमाणपत्र , महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला ही कागदपत्रे आवश्यक असतात. सदर कागदपत्र त्वरीत प्राप्त होण्यासाठी मा. तहसीलदार / उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबीर आयोजित करावे.
3. महाविद्यालयाच्या नोडल ऑफिसर यांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत शिष्यवृत्ती निहाय आवश्यक

कागदपत्रे अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार अनुदानित / विना अनुदानित अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्व पडताळणी करणे आवश्यक आहे.)

4. महाविद्यालयाच्या नोडल ऑफिसर यांनी / महाविद्यालयाच्या लिपीकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या ऑनलाईन अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back ) करावी. महाविद्यालयाच्या लिपीकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.

5. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपीकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back ) करावी. शासन निर्णय अटी शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

6. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबंधित विभागाकडे विहित कालमर्यादेत पाठवावी.

7. महाविद्यालय स्तरावर दि. 28.11.2025 ते दि. 12.12.2025 विशेष पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात यावा. सदर पंधरवाडा मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

8. दि. 28.11.2025 ते दि. 12.12.2025 पंधरवाड्यामध्ये विद्यार्थ्यांना राज्यशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी घ्यावी.

9. या कार्यालयाचे दि. 13.11.2025 रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्ष निहाय, योजना निहाय प्रलंबित अर्जांची संख्या शून्य करण्यात यावी. तसेच दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या शून्य करण्यात यावी.

10. तसेच सदर पंधरवाड्यामध्ये केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल तसेच छायाचित्रे, योजना निहाय प्राप्त अर्ज याबाबत सविस्तर माहिती व अहवाल या कार्यालयाच्या ईमेल आयडी jdpunescholarship@gmail.com वर सादर करण्यात यावी.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 02-12-2025
13:26:20

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 411016 यांना माहितीस्तव सादर.